Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं.
८३२-ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./संशोधन/ 3763
पुणे - ४११००४
दिनांक -२६/०९/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय - योग्यता प्रमाणपत्र / समकक्षता एकसुत्रीपणाच्या कार्यवाहीबाबत...... .

संदर्भ- १) छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ,यांचे जा.क्र.छ.संविमं/ उमाक/१४०४, दिनांक २८/०८/२०२४ रोजीचे पत्र

२) नाशिक विभागीय मंडळ, यांचे क्र.नाविमं /प्रमाणपत्र/यो. प्र./१५९८, दिनांक ४/०९/२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२५ च्या परीक्षेपासून प्रथमत: योग्यता प्रमाणपत्र अर्ज व त्यासंदर्भातील कार्यपद्धती ही ऑनलाईन (online) पद्धतीने नव्याने सुरू करण्यात आली असून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी दि. २६/०८/२०२४ पासून करण्यात यावी असे क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/३३३७ दि. २३/०८/२०२४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ऑनलाईन पद्धतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याचे दि. २३/०८/२०२४ रोजी परिपत्रक प्रसारित झाल्यामुळे काही उच्च माध्यमिक शाळांनी दिनांक २३/०८/२०२४ च्या पूर्वी जुन्या प्रचलित पद्धतीने विभागीय मंडळाकडून भारतीय विद्यार्थ्यांसाठी रूपये २००/- व भारताबाहेरील / परदेशातील विद्यार्थ्यासाठी रूपये ७००/- चा योग्यता प्रमाणपत्र अर्ज खरेदी केलेले आहेत. शुल्क भरून ते सर्व अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्विकारण्याची विनंती/ तक्रार अर्ज राज्यमंडळ कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त तक्रारी पाहता योग्यता प्रमाणपत्र अर्जासंदर्भात सर्व विभागीय मंडळांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) यावर्षी (सन २०२४-२५ ) दोन्ही म्हणजे ऑनलाईन व ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्विकारावेत.

२) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन पद्धतीने विभागीय मंडळाकडे भरलेले असतील त्या महाविद्यालयाकडून योग्यता प्रमाणपत्र अर्जाचे शुल्क

(भारतीय विद्यार्थ्यांसाठी रूपये २००/- व भारताबाहेरील/परदेशातील विद्यार्थ्यांसाठी रूपये ७००/-) वजा करून ऑनलाईन पद्धतीमध्ये निश्चित केलेल्या उर्वरित शुल्काची रक्कम ऑफलाईन पद्धतीने घेऊन पुढील कार्यवाही करावी.

३) ज्या महाविद्यालयांनी एकाच विद्यार्थ्याचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन आणि ऑनलाईन अश्या दोन्ही पद्धतीने भरलेले असतील तर यापैकी एकाच प्रणालीचे शुल्क स्विकारून एका प्रणालीचे मंडळाकडे प्राप्त झालेले शुल्क परत करण्याबाबतची कार्यवाही विभागीय मंडळ स्तरावर करण्यात यावी.

४) कनिष्ठ महाविद्यालयांनी खरेदी केलेले योग्यता प्रमाणपत्र भरल्यावर विभागीय मंडळाकडून विक्री केलेल्या अर्जाचा छापील क्रमांक आणि कनिष्ठ महाविद्यालयांकडून भरण्यात आलेल्या अर्जाचा छापील क्रमांक एकच आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. तसेच एकच छापील क्रमांक असलेले दोन अर्ज (योग्यता प्रमाणपत्र अर्जाच्या झेरॉक्स पती ) महाविद्यालयांकडून भरण्यात येणार नाहीत याची दक्षता विभागीय मंडळ स्तरावर घेण्यात यावी. सारांशाने छापील अर्ज मूळ प्रत असल्याची खात्री करावी.

५) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ऑनलाईन पद्धतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची कार्यप्रणाली नव्याने सुरू करण्यात आल्यामुळे या शैक्षणिक वर्षात योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन आणि ऑनलाईन या दोन्ही पद्धतीने स्विकारण्यात यावेत. मात्र पुढील शैक्षणिक वर्ष २०२५- २६ च्या परीक्षांपासून योग्यता प्रमाणपत्रांचे अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जातील याची नोंद घ्यावी. त्याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

६) मुदतीनंतर अतिविलंब शुल्काचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज निश्चित केलेले शुल्क आकारून ऑफलाईन पद्धतीने स्विकारावेत.

७) योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक ही ३० सप्टेंबर,२०२४ असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ऑनलाईन पद्धतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची कार्यप्रणाली नव्याने सुरू करण्यात आल्यामुळे या शैक्षणिक वर्षात योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याच्या तारखेत १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी नियमित शुल्क भरून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज स्विकारण्यात यावे. ही मुदत वाढ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठीच असेल. दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत योग्यता प्रमाणपत्र अर्ज विलंब शुल्काने स्विकारण्यात यावेत.

उपरोक्त प्रमाणे विभागीय मंडळ स्तरावर कार्यवाही करावी. सदर सूचना आपल्या स्तरावरून कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात याव्यात.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, -४.

पत्र क्र अविमं / उमाप / 1429
अमरावती, दिनांक 27 / 09 / 2024

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभाग अमरावती.

उपरोक्त पत्राचे अवलोकन करून त्यानूसार नोंद घेवून योग्य ती कार्यवाही करावी.

(तेजराव काळे)
विभागीय सहसचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती